# 'आमचे आम्ही'च्या संघाला साय-फाय करंडक

**पुणे** : प्रदाता कंपनीच्या क्विक हील फाऊंडेशनतर्फे आयोजित साय-फाय करंडक स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात पार पडले. महाराष्ट्र सायबर आणि थिएटर ॲकॅडमी यांच्या सहकार्याने सकळ ललित कलाघर, येथे आयोजित अंतिम फेरीत येथील 'आमचे आम्ही'चा संघ विजेता ठरला. 'आय थ्री' ही एकांकिका या संघाने सादर केली. नाट्यसंस्काराच्या एफ ५७ला द्वितीय क्रमांक मिळाला.

साय-फाय करंडक २०१८ च्या अंतिम फेरीत प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेते रितेश देशमुख आणि जॅकी श्रॉफ उपस्थित होते तर विजय केंकरे आणि आनंद इंगळे हे नामवंत कलाकार परीक्षक होते.

क्विक हील टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, सचिन पांडकर, महाराष्ट्र सायबर आणि प्रसाद पुरंदरे, अध्यक्ष, थिएटर ॲकॅडमी यांच्या हस्ते विजेत्या संघाचा सत्कार करण्यात आला. श्रीरंग गोडबोले आणि जितेंद्र जोशी यांचीही उपस्थिती होती.




कैलाश काटकर म्हणाले, साय फाय करंडकाच्या माध्यमातून अधिक चांगल्या सायबर सुरक्षेच्या गरजेबाबत जागरूकता निर्माण करणे हा क्विक हील फाऊंडेशनचा उद्देश आहे.